# मुंबई विद्यापीठ

परीक्षा विभाग / निकाल कक्ष,
दुसरा मजला,
छत्रपती शिवाजी महाराज भवन.
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी,
मुंबई ४०० ०९८.

क्र.परीक्षा / परीक्षा अर्ज / निकाल कक्ष / ५१८ / २०२६, दि. ०१ सप्टेंबर, २०२६

परिपत्रक :-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित / संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक / प्रमुख, दूरस्थ व ऑनलाइन शिक्षण केंद्राचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे व कल्याण उपकेंद्राचे समन्वयक / संचालक, सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम – २०१६** च्या तरतुदीनुसार विद्यापीठाने परीक्षांचे निकाल वेळेवर जाहीर होण्याकरिता परीक्षांच्या पध्दतीमध्ये काही अमुलाग्र बदल करण्याचे ठरविले आहे. परीक्षांचे निकाल वेळेवर जाहीर होण्याकरिता विद्यापीठाच्या या धोरणास सकारात्मक प्रतिसाद देणे अपेक्षित असून विद्यापीठाने बदललेल्या प्रक्रियेची विद्यार्थी व महाविद्यालयांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

उपरोक्त धोरणानुसार **शैक्षणिक वर्षे २०२६-२७ मधील हिवाळी -२०२६ (द्वितीय सत्र)** मध्ये होण्याऱ्या परीक्षांचे E-Samarth या अभिकरणामार्फत Fresher विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्का सोबतच दोन्ही सत्रांची परीक्षा शुल्क तसेच गुणपत्रक शुल्क व पदवीदान प्रमाणपत्र शुल्क घेतलेले असल्याने त्या विद्यार्थ्यांना परीक्षा प्रवेश अर्ज Inward करण्याची गरज नाही . अश्या विद्यार्थ्यांना परीक्षा प्रवेश अर्ज Inward न करता हॉल तिकीट देण्यात येतील. तरी सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश पत्र (Hall Ticket) PDF स्वरुपात E-Samarth Portal वर डाऊनलोडसाठी उपलब्ध करून देण्यात येतील. पुर्नपरीक्षार्थी (KT) विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज विद्यापीठाने निर्गमीत केलेल्या वेळापत्रकानुसार E-Samarth पोर्टलवर विहित मुदतीत भरण्यात यावेत.

तरी महाविद्यालयांनी सबंधित विद्यार्थ्यांचे छायाचित्र,स्वाक्षरी, नाव (मराठी व इंग्रजी या दोन्ही लिपीत) माध्यम, विषय, ABC ID / APAR ID व दिव्यांग (Person with disability) इ. बाबी बरोबर आहेत याची खात्री करून घ्यावी. सदर माहिती गुणपत्रक व पदवी प्रमाणपत्र यासाठी वापरण्यात येणार आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

तरी या परिपत्रकामध्ये नमूद असलेल्या सर्व बाबींचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

स्थळ : मुंबई
दि. : ०१ सप्टेंबर, २०२६

(डॉ. पूजा रौंदळे)
संचालिका
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित / संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक / प्रमुख, दूरस्थ व ऑनलाइन शिक्षण केंद्राचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेद्रांचे समन्वयक/संचालक व सहायक कुलसचिव

**अ. प्रत माहितीस्तव व योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषितः-**

१. संचालक, माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान विभाग, परीक्षा विभाग, मुंबई- ४०० ०९८.
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.
३. उपकुलसचिव (नाव नोंदणी विभाग), डॉ. आंबेडकर भवन, मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.
४. उपकुलसचिव / मुख्य लेखापाल, वित्त व लेखा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई- ४०० ०९८.
५. सर्व वरिष्ठ यंत्रणा नियोजक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई- ४०० ०९८.
६. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.
७. सर्व यंत्रणा परीचालन अधिकारी, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, मुंबई- ४०० ०९८.
८. समन्वयक, MKCLपरीक्षा विभाग, मुंबई- विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.

**ब. प्रत माहितीसाठी अग्रेषितः-**

१. मा. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई-४०० ०३२.
२. उपकुलसचिव (जनसंपर्क), परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.
३. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०३२.
४. प्र. कुलगुरू / कुलसचिव / वित्त व लेखा अधिकारी / संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक

(डॉ. पूजा रौंदळे)
संचालिका
परीक्षा व मूल्यमापन मंडळ